# DR. BABASAHEB AMBEDKAR AND CONTEMPORARY ISSUES



Editor

**Dr.Balasaheb Chandraprakash Kilche**

# DR. BABASAHEB AMBEDKAR AND CONTEMPORARY ISSUES

**Editor**

**Dr.Balasaheb Chandraprakash Kilche**

Aadhar Publications, Amaravati

# Index



| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर – सामाजिक,कायदे व राजकीय विचार<br>**प्रा.भागवत शंकर महाले** | 1 |
| 2 | महिलांचे सबलीकरण : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. रमेश रामराव बैनवाड** | 9 |
| 3 | डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ<br>**पल्लवी बिभीषण हिंगे , डॉ.संजयकुमार गायकवाड** | 15 |
| 4 | शिक्षणतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक विचार<br>**डॉ. महेंद्र एम. श्यामकुल** | 27 |
| 5 | डॉ बाबासाहेब आंबेडकर: उपेक्षित समाजाचे शिक्षणतज्ज्ञ<br>**प्रा.अष्टेकर नितीन वसंतराव** | 33 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन<br>**प्रा.दादाराव चंद्रभान काटकर** | 39 |
| 7 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार<br>**प्रा. डॉ. सोमगोंडे एन.एस.** | 46 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय लोकशाहीची सद्यास्थिती<br>**डॉ. नागेश्वर रा.कन्हाके** | 49 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व लाभलेल्या विदर्भातील दलितांच्या सामाजिक चळवळी<br>**मधुकर मनोहर वासनिक** | 54 |
| 10 | अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रविण राजकुमार भगत** | 59 |
| 11 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार<br>**डॉ.सविता नागे** | 64 |

| | | |
|---|---|---|
| 12 | हिंदू कोड बिल आणि भारतीय स्त्री मुक्तीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार संवाद **सविता चंद्रकांत वाकडे** | 71 |
| 13 | डॉ. बी. आर. अम्बेडकर का धार्मिक विचार : एक विमर्श **डॉ. रमेश रोहित (रत्नशील राजवर्धन)** | 76 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक चिंतन **प्रा. राजु दिपक खराटे** | 82 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्न **सोनु शेषराव मिराशे** | 89 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार **प्रा. स्मिता धनिराम टेंभुर्णे** | 93 |
| 17 | स्वातंत्र्योत्तर काळातील महिला सक्षमीकरण **कांबळे मोकिंदराज वैजनाथ** | 99 |
| 18 | डॉ. भीमराव एवं नारी शिक्षा **डॉ. राजमती वर्मा** | 103 |
| 19 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान **डॉ.राहुल देवराव डोंगरदिवे** | 108 |
| 20 | डॉ. भीमराव अंबेडकर के शैक्षणिक विचार **डॉ. हरे कृष्ण** | 115 |
| 21 | मराठी आंबेडकरवादी काव्यकार डॉ.गोविंद नामदेव रावळेकर | 121 |
| 22 | राजकीय,सामाजिक परिवर्तनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे योगदान **प्रा.गांगुर्डे रामदास भीमा** | 129 |
| 23 | Dr. B.r. Ambedkar's vision on empowerment and education **Dr Pinki Rani Dei** | 137 |
| 24 | Bharat Ratna Dr. B R Ambedkarji: A prophet of the Indian Constitution Research Article submitted by **Dr Rakhi Sinha** | 142 |

| | | |
|---|---|---|
| 25 | Role of Dr. Ambedkar in Indian Journalism<br>**Dheerika Sharma, Amanjyoti Kaur** | 147 |
| 26 | Dr. Ambedkar And Gender Equality<br>**Dr. Suryakant C. Solanki** | 152 |
| 27 | Dr.Babasaheb Ambedkar's View on Women Empowerment<br>**Dr.Ghorpade L. B., Dr. Waghchoure R.K.** | 159 |
| 28 | Relevance Of Ambedkar's Journalism In Today's World<br>**Dheerika Sharma,Manzoor Ahmad Dar** | 162 |
| 29 | डॉ. वावासाहेव आंवेडकर आणि भारतीय लोकशाही<br>**प्रा. डॉ. भगवान वि. धोटे** | 167 |
| 30 | डॉ वावासाहेव आंवेडकर यांचे भारताच्या सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्यलढ्यातील योगदान **डॉ श्रीनिवास भोंग** | 173 |

# राजकीय,सामाजिक परिवर्तनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे योगदान

प्रा.गांगुर्डे रामदास भीमा
एम.ए, बी.एड, सेट,पेट, पी.एच.डीAPP.राज्यशास्त्र.(विभाग प्रमुख) सुपे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुपे,ता.बारामती जि.पुणे.
Emil - abhiramdip@gmail.com,Mob.No-7219456215

१.प्रस्तावना.

भारत हा मोठ्या लोकसंख्येचा देश तसेच लोकशाही व्यवस्था असलेला देश म्हणून बघितले जाते. भारत स्वतंत्र उन्नतीत, परिवर्तन विकास कार्यात येथील सर्वच समाज वर्ग घटकांचा मोठा वाटा आहे. भारतातील राजकीय, धार्मिक आर्थिक, सामाजिक सुधारणा साठी भारतातील राजाराम मोहनरॉय, रानडे, गोखले, धोंडो केशव कर्वे, लोकमान्य टिळक ,आगरकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बी. आर. आंबेडकर यासारख्या महान सामाजिक, राजकीय विचारवंत, अभ्यासक समाजसुधारकांनी मोठे योगदान दिले आहे. परंतु या सर्व परिवर्तनात भारतीय सामाजिक, राजकीय चळवळीचा इतिहास दलित, मागास समाजात चळवळीचा आधार म्हणजे. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे प्रभावी नेतृत्व आणि परखड शब्द, स्पष्ट ,निर्भीड विचारांच्या मांडणीतून निर्माण झालेली पत्रकारिता. पत्रकारिता लिखाणाद्वारे या चळवळीला दिशा देणारे अशी सर्वव्यापी आणि प्रभावी तत्वज्ञान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले आहे. म्हणून आधुनिक राजकीय सामाजिक चळवळीत भारतीय विकास ,परिवर्तनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे योगदानाचा अभ्यास महत्त्वपूर्ण आणि " न भूतो न भविष्यती" असा ठरला आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता भारतासह संपूर्ण जगासमोर एक ऐतिहासिक पत्रकारिता म्हणून अभ्यासली जाते.हे महत्त्वपूर्ण आहे.

**२. अभ्यास पद्धती**

**शोधनिबंध तयार करण्यासाठी वर्णनात्मक निरीक्षण अभ्यास पद्धतीचा आधार घेतला आहे.**

**३.शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. भारतातील राजकीय पत्रकारितेचा अभ्यास करणे.

२.भारतीय राजकीय,आर्थिक, सामाजिक परिवर्तनास पूरक ठरणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा अभ्यास करणे.

३.आधुनिक समाज माध्यमे आणि डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय पत्रकारितेचे गरज ,महत्वचा अभ्यास करणे.

**४.शोधनिबंधाची गृहितके.**

१.भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शिक्षण, कृषी, परिवर्तनातील जागृतीक्षेत्रावर पत्रकारीतेचा प्रभाव पडतो.

२.डॉ.बाबासाहेबांच्या पत्रकारितेतून दलित,दुर्बल,आर्थिक मागास बहुजन समाज व भारतातील महिला सुधारणांना नवी प्रभावि दिशा प्राप्त होते.

३.डॉ.बाबासाहेबांच्या राजकीय पत्रकारितेचे गरज ,महत्वचा अभ्यास आधुनिक समाज माध्यमे पत्रकारितेस पूरक ठरतात.

**५.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निर्भिड लेखणी व पत्रकारिता.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की माझे लिखाण चालू असताना माझ्यातील सर्व शक्ती एकवटल्या असतात बाबासाहेबांची प्रभावी नेतृत्व प्रखंड शब्द निर्भिड विचारांचा मांडणीतून राजकीय पत्रकारिता निर्माण होऊन सर्व व्यापक अशा पद्धतीची चळवळ उभी केली आहे पत्रकारितेतून व्यापक दिशा देणारी तत्वज्ञान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले आहे पत्रकारितेतून विरोधात वर्ग धर्म समाज घटकांना एकत्र बांधून सामाजिक राजकीय चळवळीला व्यापक क्रांतिकारी स्वरूप उभे केलेले आहेत म्हणून येथील जात वर्ग धर्म व्यवस्थेला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीने पत्रकारितेच्या माध्यमातून एक मोठे आव्हान देणारी अशी पत्रकारिता ठरलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतून स्वतंत्र राज्य घटनेचे स्वतंत्र पैलू व विचारांची मांडणी केलेली आहे सर्वव्यापक प्रभावी चळवळी सामाजिक जागृती विज्ञानवादी दृष्टिकोन डॉलर्स पद्धती सामाजिक मार्गांनी विचाराची प्रत्येक मधी समाजासमोर मांडणी करून पत्रकारितेच्या माध्यमातून त्याची व्यवस्थित मांडणी केलेली दिसत आहे डॉ.बाबासाहेबांच्या निर्भीड स्पष्ट आणि प्रखर वास्तव पत्रकारिता या विषयावर ज्येष्ठ लेखक विचारवंत डॉ.गंगाधर पानतावणे यांनी स्वतंत्र अशी पुस्तक लिहिलेले आहे.

**६.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची पत्रकारिता.**

डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारिता संबंधी विचार मुद्दे लक्षात घेता 1930 ते जनता मूकनायक आणि बहिष्कृत भारत प्रबुद्ध भारत इत्यादी आणि पाक्षिके आणि वृत्तपत्र पुस्तकांचा अभ्यास तितकाच महत्त्वपूर्ण ठरलेला आहे भारत या वृत्तपत्राचे संपादक देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बसवलेली आहे पत्रकारितेच्या चळवळीतून महाडचा 1927 रोजीचा सत्याग्रह व 1920 सामाजिक,राजकीय चळवळ ही "मूकनायक" आणि "बहिष्कृत भारत" वृत्तपत्रातून प्रभावी क्रांतिकारी अशी बनवलेली दिसते आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतून ब्रिटिश आणि येथील प्रस्थापित व्यवस्था धोरण त्या त्या वेळच्या परिस्थिती बघूनच त्यांनी आपली भूमिका विचार स्पष्ट

निर्भीड वास्तव आणि प्रभावीपणे पत्रकारितेच्या माध्यमातून बांधण्यात यशस्वी झालेल्या आहेत. हे स्पष्ट दिसत आहे उदाहरणार्थ 1927 च्या सायमन कमिशन मध्ये आम्हाला आमची आत्ताची भूमिका मांडावयाची होती. परंतु त्याला विरोध न करता त्याद्वारे आमच्याजवळ संबंधी येथील प्रस्थापित व्यवस्थेच्या संबंधी काही महत्वाचे मुद्दे मांडायचे आहेत. असे निर्भीडपणे स्पष्ट वाक्यात स्पष्ट शब्दात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केलेली दिसत आहे.

डॉ. बाबासाहेबांनी 1930 मध्ये "जनता वृत्तपत्र" स्थापन केले त्याच्या माध्यमातून आपले ब्रिटिश सत्तेविरुद्ध असे मत त्यांनी स्पष्टपणे वैचारिक पातळीवर मांडून ब्रिटिश सत्तेला विरोध केलेला ते आपल्या पत्रकारितेतून ते साध्य केलेले आहे. हे स्पष्ट दिसत आहे मिस्टर महात्मा गांधीजी 1930 मध्ये देशाचे नेतृत्व करत होते त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गांधीजींना मिस्टर गांधी असे म्हटलेले आहे तर गांधीजींनी ही डॉ.बाबा आंबेडकरांना मिस्टर आंबेडकर असे म्हटलेले आहे त्यांच्यातील हा परिसंवाद म्हणजे अनेक वेळा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेच्या माध्यमातून निर्भीड स्पष्टपणे मांडलेला आहे.1952 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर विरुद्ध महात्मा गांधीजी आणि मिस्टर गांधी विरुद्ध मिस्टर आंबेडकर असे केवळ राजकीय, सामाजिक विचार धोरण सिद्धांतावर वैचारिक विरोध चालत असे विचाराच्या किंवा वैचारिक पातळीवरच मतभेद निर्माण झालेली आहेत. त्यांच्यात कायमचकुठल्याही प्रकारच मत्सर द्वेष ,वैरअसे नव्हते गांधीजींच्या संकुचित,राजकीय, सामाजिक धोरणावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेतून प्रहार केला आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत विरोध करून तो पोचलेला समजत आहे.

**७.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजकीय पत्रकारिता.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जेव्हा 1937 मध्ये कोकणातून आमदारम्हणून निवडून आले.त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला एक सर्वव्यापक दिशा आणि क्रांतिकारी प्रेरणा निर्माण झाली. ती त्यांच्या राजकी पत्रकारितेच्या माध्यमातूनच 1930 च्या दशकात डॉ.बाबासाहेबांच्या राजकारणातही एक सर्व व्यापक स्वरूप निर्माण झाले. त्या माध्यमातून अनेक सामाजिक, राजकीय चळवळी प्रभावी ठरू लागली याचे त्यांना 1937 च्या पत्रकारितेतून केलेल्या योगदानातूनच दिसू आले आहेत. डॉ.बाबासाहेबांच्या पत्रकारितेतून अभ्यासाची मांडणी बघता याच काळात **दोन" मॉडेल्स**"आपणास पहावयास मिळतील पुढील प्रमाणे आहे.

प्रथम मॉडेल्स 1930 मध्ये **"जाती मॉडेल"**हाच वर्ग धर्मावर आधारित असे व्यापक राजकारण त्यांना बघावयास मिळाली दुसरी मॉडेल **"धम्म चळवळ"**डॉक्टर बाबासाहेबांच्या चळवळीला पूरक असे ठरू लागली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केळसकर गुरुजींनी बुद्धचरित दिले . त्यांनी ते वाचले त्यासंबंधी विचारमंथन मांडले

धर्माच्या बावतीत केळसकर गुरुजींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसीसर्व संवाद आणि चर्चेतून विचार मांडले. त्याचा सर्व वृतांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून स्पष्टपणे समाजासमोर मांडलेली दिसतात.

येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिकाही 1920 ते 1940 पर्यंत म्हणून बघितली नव्हती. त्यांनी आपल्या पत्रकारितेतून कधीच पुरानी सांगितलेली दिसत नाहीत तसे अजून तरी कुठेही त्याचा उल्लेख अजून आलेला नाही डॉ. बाबासाहेबांच्या विचारात शीख, ख्रिश्चन ,पारशी नंतर त्यांची भूमिका बदलत गेली.1942 नंतर ही भूमिका बदलत गेल्याचे समजते. डॉ. आंबेडकर यांच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यापक चळवळीतून आणि पत्रकारितेच्या नेहमी प्रभावी स्पष्ट लेखणीतून पाकिस्तान संदर्भात मोठी वकिलाची भूमिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली दिसते आहे.

एक पार्टिशन का होत आहे? पार्टिशन का होत गेली?.पार्टिशनका करणे ? आणि पार्टिशन होणे आवश्यक होते का? अशा अनेक विविध प्रश्नांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडणी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी परखडपणे त्यांच्या पत्रकारिता लेखणीतून सांगितले. आत्ताच्या घडीला पार्टिशन कोणत्याही प्रकारे योग्य नाही. बॅरिस्टर जीनांना वैचारिक पातळीवर विरोध केलेला आहे. तुमचासंकुचित राष्ट्रवाद आता तरी या घडीला भारताच्या समाजासाठी बरोबर नाही. संकुचित राष्ट्रवादाची 1920 ते 1932 मध्ये मोठ्या प्रमाणात प्रभावी ठरला. तो संकुचित राष्ट्रवाद येथील भारतीय समाजाला विशेषता मागासवर्गीय समाजाला आणि महिलांच्या उन्नती, विकासाला कधी चांगला ठरला नाही. असे स्पष्ट विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या संकुचित राष्ट्रवादाचा विरोध करून पत्रकारितेच्या माध्यमातून स्पष्ट लेखणीतून मांडलेली दिसतात आणि याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेच्या स्पष्ट निर्भीड मांडणी तो पारधी समाज मात्र राजकीय विचार सामाजिक सुधारणा आणि उन्नती विकासाची क्रांती प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेतून प्राप्त झालेली दिसत आहे.

**८.डॉक्टर बाबासाहेबांची पत्रकारितेतून जात धर्म व्यवस्था विरुद्धार्थी लिखाण.**

डॉ.बाबासाहेबांच्या स्पष्ट निर्भीड पत्रकारितेचा लिखाणातून जातीविरहित विचार प्रभावीपणे संकल्पना मांडली दिसत आहे. जात, धर्म व्यवस्थेला आव्हानात्मक लिखाण केलेली दिसत आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या धम्माचे धम्मामध्ये **" माणूस "** हा केंद्रबिंदू मानला जात आहे. जगात देव नाही, दैववादावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कधीच विश्वास नव्हता. त्यांचा व्यक्ती पूजेला, मूर्तिपूजेला विरोध होता 1930 मध्ये सर्वव्यापी दलित राजकारण केवळ व्यापक पद्धतीने पुढे आणण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची क्रांतिकारी पत्रकारिता त्याला प्रभावीपणे पूरक अशीच ठरलेली दिसत आहे. म्हण डॉ.बाबासाहेबांची पत्रकारिता त्यांचे पत्रकारितेतील विचार त्या विचारांची प्रभावी आणि निर्भीड केलेली मांडणी ही येथील समाजाच्या परिवर्तनासाठी संजीवनी ठरलेली आहे. असे समजते 1945 व 1946 च्या दशकात

जाती-अंत होईल असे डॉ.बाबासाहेबांना पाठवत होते. मात्र तसे झालेले दिसत नाही. त्यांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला या आवाहनाने अपयश आले.

याच परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात "बुद्ध धम्म" हाच एक पर्याय असू शकतो हाच धर्म वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.शोषितांच्या चळवळीचा अभ्यास करण्यासाठी पत्रकारिता प्रभावी मांडण्यासाठी चा प्रयत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला.असे स्पष्टपणे दिसत आहे. भारतातील जाती व्यवस्था, प्रस्थापित धर्मव्यवस्था, घातक जाती व्यवस्थेतील विविध कर्मकांडांना वाचा फोडण्यासाठी बुद्ध धम्माचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. या ठिकाणी राजकीय स्थित्यंतरे लक्षात घेतल्यास दैववाद,व्यक्तिपूजा,मूर्तिपूजा आणि अंधश्रद्धा कर्मकांड डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून परखडपणे केलेला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी तम्मा स्वीकारला हा काळ प्रभावी ठरला आणि महत्त्वपूर्ण ही मानला जातो.

परंतु 1956 नंतर म्हणजेच आंबेडकरांच्या नंतर ही चळवळ स्पीड किंबहुना थंड होत गेलेली आपल्याला दिसत आहे त्यानंतर व्यक्तीपूजा मूर्तिपूजा, दैववादाला प्राधान्य मिळालेली दिसते. हे भारतीय समाजाच्या चळवळीला समाज उन्नती ,परिवर्तन बदलाला हानिकारक ठरले आहे .हे मात्र निश्चित आणि सुस्पष्ट असे दिसत आहे. भारतात आत्ता आणि पूर्वीपासून व्यक्तिपूजा मोठ्या प्रमाणात महत्त्व दिसल्याचा इतिहास आहे. हे केवळ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रती नव्हे तर भारतातील म. गांधीजी ,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ही कालखंडामध्ये व्यक्तिपूजा व मूर्तिपूजा महत्त्व दिले गेलेले दिसत आहे. तेच नेमके सामाजिक, राजकीय चळवळीला हानिकारक ठरली ते आज त्याची पुनरावृत्ती होताना दिसत आहे. स्पष्ट जाणवत आहे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची भूमिका ही आंबेडकरी चळवळ, राजकारण आणि पत्रकारितेतून विचार मांडलेले समजते. त्याचबरोबर पत्रकारितेच्या माध्यमातून डॉ. बाबा बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची भूमिका मांडलेली स्पष्टपणे आपल्याला दिसत आहे.

**९ .आधुनिक पत्रकारिता व प्रसार माध्यमे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता.**

आजच्या पत्रकारितेचे वास्तव निरीक्षण अभ्यास करता पत्रकारितेच्या माध्यमातून संकुचित विचार दृष्टिकोनातून मांडणी केली जाताना दिसते. खरे तर उपेक्षित, गरजू अशा घटक व्यवस्थेवर पत्रकारितेतून लिखाण स्पष्ट निर्भीड मांडणी होतांना दिसत नाहीस. पत्रकारिता ही कुठेतरी राजकीय, राजकारणी भूमिकेच्या माध्यमातून संकुचित विचार दृष्टिकोनातून होताना दिसत आहे. भारतातील आधुनिक परिवर्तन विकासाचे अनेक प्रश्न, घटक असून त्याची व्यवस्थित मांडणी होताना दिसत नाही. खरतर वास्तव निर्भीड स्पष्ट अशा शब्दांमध्ये किंवा चित्रीकनामध्ये आधुनिक प्रसार माध्यमे आणि पत्रकारितेची वाटचाल होताना फार कमी दिसत आहे. म्हणून आधुनिक

पत्रकारितेत आणि प्रसार माध्यमांना संकुचित असा राजकीय वारा लेखणीला, प्रसार-प्रचाराला दिसतो आहे.

परंतु तत्कालीन राजकीय सामाजिक, आर्थिक, जातीय, धार्मिक, प्रस्थापित समाज व्यवस्था, अशिक्षित आणि निरीक्षर समाज अशा काळातही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेच्या माध्यमातून भारतातील दलित उपेक्षित मागास बहुजन समाज घटक त्याचबरोबर भारतातील " स्त्री"उन्नती व विकास प्रगतीसाठी स्पष्टपणे निर्भीड विचार मांडून प्रस्थापित सत्तेला प्रस्थापित व्यवस्थेला जात-धर्म व्यवस्थेला आव्हान उभे केलेले आपल्याला दिसत आहे. त्याच माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली पत्रकारितेतून अन्याय-अत्याचार आणि संकुचित राजकीय धोरणांना आव्हान आपल्या निर्भीड स्वच्छ वास्तव पत्रकारितेच्या लिखाणातून मांडून एक ऐतिहासिक क्रांतिकारी अशी पत्रकारिता साकारलेली आपल्याला दिसत आहे. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या स्पष्ट निर्भीड लेखणीतील पत्रकारिता आणि त्या पत्रकारितेची महत्त्व विचाराची महत्त्वपूर्ण गरज आहे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता मांडणी आजच्या पत्रकारितेच्या व प्रसार माध्यमांच्या दृष्टिकोनातून एक प्रभावी आणि निर्भीड अशीच पत्रकारिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वव्यापक अशी निर्माण केलेली दिसत आहे.

**१०.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता भारतीय महिलांचा उदय विकासस परिवर्तन बदलास एक महत्त्वपूर्ण संजीवनी ठरली.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाला बुद्धत्व कसे प्राप्त झाल बुद्ध आणि त्यचा धम्मडॉ.बाबासाहेब आंबेडकरानी मांडलेला बुद्ध धम्म यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेच्या माध्यमातून निर्भीड स्पष्ट वास्तव अशा लेखणीतून विचाराची केलेली आहे.1956मध्ये" बुद्ध अँड हिज धम्म " ग्रंथाची रचना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली तो ग्रंथ क्रांतिकारी सर्वव्यापक समाजवादी, सामाजिक, स्त्रीवाद स्त्री स्वातंत्र्य उन्नती,परिवर्तन, बदल आणि भारतातील जाती अंताच्या बाबतीत त्याची मांडणी केलेली आपल्याला दिसत आहे.तो त्यांच्या पत्रकारितेतून मांडलेल्या आहे.

1950 च्या दशकात "जनता बहिष्कृत भारत" "मूक नायक" वृत्तपत्रांतून लिखाण स्पष्ट आणि निर्भिड शब्दांमध्ये मांडणी केली. त्यामध्ये भारतीय स्त्रियांच्या उन्नती विकास परिवर्तन आणि स्वातंत्र्य न्याय हक्क मान-सन्मान संदर्भात पत्रकारितेच्या माध्यमातून डॉ.र बाबासाहेब आंबेडकरांनी क्रांतिकारी असे मार्मिक विचाराची लेखणीतून आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून विचाराची मांडणी केलेली दिसत आहे. उदाहरणार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी मध्ये आणि महिला क्रांतीमध्ये सावित्रीबाई बोराडे आणि अंबुबई गायकवाड या महिला अग्रेसर व सहभागी होत्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत मोठ्या प्रमाणात स्त्रिया/ महिला सक्रिय होत्या स्त्रीयांना प्रेरित व सक्षम करतांना त्यांचे ध्येय त्यांचे स्वातंत्र्य पाठबळ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या या पत्रकारितेचा स्पष्ट लेखणीतून वाढलेली

आहे. ते त्याही वेळेस निश्चित झाले होते. आजही स्पष्ट दिसत आहे. कारण भारतातील काही प्रस्थापित समाजघटकांनी डॉ.बाबासाहेबांच्या या " स्त्री "उन्नती परिवर्तन विकासला आव्हान उभे केलेले होते. तरीही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेच्या स्पष्ट लिखनेणी ते त्याला आव्हान देऊन महिला उन्नती विकास क्रांती चळवळीला 1930 च्या दशकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठी आव्हान दिलेले आपल्याला दिसत आहे.

डॉ.बाबासाहेबांच्या या पत्रकारितेच्या आव्हानाला, प्रस्थापितांनी महिला चळवळीचा आवाज दाबण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु "स्त्री" चळवळींना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेमध्ये भारतातील महिला बरोबर दलित महिला येथील पुरुष सत्तेलाआव्हान देणारी अशी ठरलेली आहे. एकूणच महिलांच्या हक्क स्वातंत्र्य न्याय मान सन्मान मिळवून देण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता महिला क्रांती चळवळीला एक बळदिले याची स्पष्ट दिसत असून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेच्या माध्यमातून एक क्रांतिकारी प्रेरणा आणि संजीवनी प्राप्त झालेली आपल्याला दिसत .

**११.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर एक द्रष्टा पत्रकारिता महापुरुष.**

डॉ.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर एक द्रष्टा पत्रकारिता आणि निर्भीड स्पष्ट वास्तव कोणत्याही परिस्थितीत न घाबरता आपल्या पत्रकारितेतून परखड विचार मांडणारा जागतिक आणि व्यापक अशा पत्रकारितेचा प्रणेता म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना म्हणावे लागेल डॉ.बाबासाहेबांनी आपल्या पत्रकात गाडीतून प्रभावी निर्भीड आणि वास्तव परिस्थिती सत्ते लेखनातून स्पष्ट अशी मांडणी केलेली आहे त्यांच्या विचारात लिखाणातून भारतातील प्रस्थापित समाज शोषितांना सत्ता धारकांना हुकूमशहांना राजकारण्यांना एक मोठे आव्हान उभे केल्याचे चित्र त्यांच्या पत्रकारितेच्या मांडणीतून आपल्याला दिसत आहे.

डॉ. वावासाहेव आंबेडकरांच्या राजकीय सामाजिक पत्रकारितेतून एक सर्वव्यापक आणि जात-धर्म वर्गाच्या पलिकडची भूमिका स्पष्टपणे मांडलेली आहे. असे मिस्टर महात्मा गांधीजी आणि मिस्टर बॅरिस्टर जीना ने ही मान्य केलेले आहे . डॉ. वावासाहेव आंवेडकरांच्या पत्रकारिता व भूमिका गांधीजी आणि जीनांनी ही मान्य केल्याचा उल्लेख आहे.डॉ.र बाबासाहेब आंबेडकरांचे विचार डॉ.बाबासाहेब आंवेडकरांच्या सामाजिक राजकीय चळवळी प्रबोधन प्रेरणा क्रांतिकारी चेतना यांनी आपल्या पत्रकारितेतून भारती समाजालाच नव्हे तर संपूर्ण जगासमोर मांडली.

त्यामुळे त्यांची पत्रकारिता त्या पत्रकारितेची विचार येतील दलित दुर्बल वहुजन समाज घटक आणि भारतातील महिला, स्त्रियांना त्यांच्या उन्नती, प्रगती, विकासाला मोठे पाठबळ देणारी अशीच असल्याचे स्पष्ट होत आहे.

डॉ.वाबासाहेव आंवेडकरांची निर्भीड अचूक आणि परिस्थितीसापेक्ष विचाराची मांडणी आपल्या पत्रकारितेतील लिखाण जात धर्म वर्गाच्या पलीकडील असून सर्वव्यापक

अशीच ठरलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही एक द्रष्टा महापुरुष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता एक सर्वव्यापक आणि निर्भीड अशीच ठरलेली आहे.

म्हणून मला असे म्हणावेसे वाटते " इतिहास लिहिणारी सोयीस्करपणे विसरतात त्यांना सत्य दडपून टाकायचे असते परंतु सत्य कधी मरतच नाही. कारण प्रकाशाची कवच धारण केलेली असते." अशीच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता या ठिकाणी ऐतिहासिक महत्त्वपूर्ण अशीच आहे.

**संदर्भ --**

१.डॉ.बाबासाहेब आंबेडकराची पत्रकारिता - डॉ.गंगाधर पांनतावणे.
२.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची पत्रकारिता - प्रा.प्रबोधन पोळ.
४.पत्रकारितेचे मुलतत्वे - प्रा.आवटे संजय.
५.२०१४ च्या निवडणुका देशाचा चेहरा मोहरा बदलणारी - प्रा.र.घ.वराडकर.
६.लोकत,सकाळ ,लोकसत्ता,सम्राट वृत्तपत्र प्रकाशित लेख.
७.रेडीओ,दूरदर्शन माध्यमांची विविध मान्यवरांची मुलाखती.